नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 08/09/2023 (शुक्रवार) दुपार

## ॲल्युमिनीअम तार चोरी

**पो.स्टे. खापा** :— अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील हिंगणा फाटा येथे दिनांक ०६/०९/२०२३ चे २३.३० वा. ते दिनांक ०७/०९/२०२३ चे ०७.०० वा. पुर्वी अज्ञात आरोपीने बडेगाव वितरण केंद्रातील गावाला जोडणारे मौजा कोच्छी या परीसरातील ११ केबी विदयुत लाईनचे अंदाजे ७०० मिटर ॲल्युमिनीअम तार अंदाजे किंमती ५५०००/— रूपयाचा मुद्देमाल कोणत्यातरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— मोहन लक्ष्मीकांत राउत, वय २४ वर्ष, रा. नवीन नांदा कोराडी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास नापोशि संतोष परतेकि ब. नं २१६३ पोस्टे खापा ९१११२११७५४७ हे करीत आहे.

## चोरी

**१) पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील राजुरवाडी येथे दिनांक ०७/०९/२०२३ चे ०८.०० वा. ते १४.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ आरती सुरज राजपुत, वय ३२ वर्ष, रा. राजुरवाडी ता. उमरेड तीचे पती व मुलगी शेतात काम करण्याकरिता गेले तेव्हा घरी सासु व लहान मुलगा होते. दुपारी ०२.०० वा. दरम्यान शेतातुन घरी आल्यावर स्वत:ची तयारी करण्याकरिता बेडरूममध्ये गेली असता आलमारीतुन क्रीम पावडर काढण्याकरिता आलमारी उघडली असता आलमारीचे आतमधील लॉकर मध्ये पिवळया धातुचे भांडे पाहीले असता त्यातील जुनी वापरती गहु मण्याची पोत २० मणी असलेली ८ ग्रॅम किंमती १०,०००/—रू कानातील एक जोड २ नग ४ ग्रॅम किंमती ५,०००/— रू असा एकुण १५,०००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेलेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/४८६ प्रदीप चवरे मो. क्र. ७७९८६६८८३८ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. अरोली** :— अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील मौजा खापरखेडा शिवार येथे दिनांक ०२/०९/२०२३ चे १८.०० वा. ते दिनांक ०३/०९/२०२३ चे सकाळी ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— वेंकटेश्वरराव व्ही. जागर्लामूडी, वय ५४ वर्ष, रा. अरोली यांचे खापरखेडा शिवार येथील शेतात लावलेली १) टेक्सो कंपनीची ०२ एच. पी ची पानबूडी मोटार किंमती ८०००/—रू २) लक्ष्मी कंपनीची ०३ एच पी ची पानबूडी मोटार किंमती ७०००/— रू असा एकूण १५,०००/—रू माल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोना/२०१७ दत्ता बघमारे पोस्टे अरोली मो. नं. ७०३०१०९९६४ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर